**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION**

**मुख्य कार्यालय**

५$^{१/२}$,७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत,महर्षि कर्वे मार्ग,कुपरेज, मुंबई-४०० ०२१ २२७९५९००, फॅक्स-२२८८०५२४

5$^{1/2}$,7, 8th Floor, Cooperage Telephone Corporation building, Maharshi Karve Road, Cooperage, Mumbai-400 021 22795900, Fax-22880524

**फोर्ट कार्यालय**

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, म. गांधी मार्ग, हुतात्मा चौक, फोर्ट, मुंबई- ४०००01 २२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२ फॅक्स - २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Fort, Mumbai-400001 22670210/148/248,22102222 Fax : 22673915

**ई-मेल** – sec.mpsc@maharashtra.gov.in **वेबसाईट** - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


**क्रमांक :-** पत्र क्र.163(2)/2018/14-ब **बैठक क्र. :** MB001289 **दिनांक :-** 17-07-2019

**प्रति,**

KALE PRATIKSHA NANASAHEB
Latur (M Cl), Latur, Latur
PIN - 413531

**विषय - महाराष्ट्र वन सेवा (मुख्य) परीक्षा, 2018 शिफारशीबाबत.**

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्यात येते की, सहायक वन संरक्षक, गट-अ 16 पदे आणि वनक्षेत्रपाल, गट-ब - 53 पदे अशा एकूण 69 पदांसाठी 'महाराष्ट्र वन सेवा (मुख्य) परीक्षा-2018 दिनांक 28 ऑक्टोबर, 2018 रोजी मुंबई केंद्रावर दोन सत्रात घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेच्या दिनांक 24 मे, 2019 रोजी जाहीर झालेल्या अंतिम निकालानुसार आपली सहायक वनसंरक्षक, गट-अ या पदाकरिता सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग (फ-8), मंत्रालय, मुंबई-400032 यांचेकडे शिफारस करण्यात येत आहे.

2. आपण अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने विहित वयोमर्यादा, विहित केलेली आवश्यक शैक्षणिक अर्हता, मराठीचे ज्ञान, शारीरिक अर्हता तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (NCL Certificate) विहित तारखेस धारण करीता असल्याच्या बाबी तसेच सामाजिक व समांतर आरक्षण विषयक दावे आपल्या मूळ प्रमाणपत्रांआधारे तपासली असून, सदर दावे प्रस्तुत पदाच्या जाहिरातीतील व अधिसूचनेतील तरतूदींच्या अनुषंगाने नियुक्तीपूर्वी शासनाच्या विहित/सक्षम प्राधिका-यांकडून मूळ प्रमाणपत्रांआधारे त्यांची वैधता / सत्यासत्यता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, प्रस्तुत निकालाआधारे आपली शासनाकडे शिफारस करण्यात येत आहे. सदर तपासणीत पात्र ठरल्यासच आपणांस विषयांकित पदावर नियुक्ती देण्यात येईल.

3. आपण आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार मूळ कागदपत्रांच्या आधारे दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरल्यास आपली उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

4. विषयांकित परीक्षेच्या संवर्गातील पदांच्या शिफारशी समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यासंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहेत.

5. अर्जामध्ये खोटे / चूकीचे दावे करणे, सत्य माहिती दडविणे या अत्यंत गंभीर बाबी आहेत. या संदर्भात आपले लक्ष उमेदवारांच्या सर्वसाधारण सूचना व आपण सदर परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील प्रतिज्ञा पत्राकडे वेधण्यात येत आहे.

6. साक्षांकन नमुना आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर साक्षांकन नमूना डाऊनलोड करुन घेण्यात

यावा व संपूर्ण भरुन तो सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग (फ- 8), मंत्रालय, मुंबई-400 032 यांचेकडे तात्काळ पाठवावा. साक्षांकन नमून्यातील रकाना क्रमांक - 11 मध्ये अटक, शिक्षा, दंड व इतर काही कारवाई झाली असल्याबद्दलची माहिती होय किंवा नाही या उत्तराने भरावी. संबंधित रकाना कोरा ठेवल्यास किंवा नुसती रेघ मारल्यास असा नमुना स्वीकारण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

7. नियुक्ती संदर्भातील पुढील सर्व पत्रव्यवहार उपरोक्त शासकीय प्राधिका-यांकडेच करण्यात यावा.

आपली विश्वासू

(अ.वि.राणे)
अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

This is system generated document does not need signature.